॥ कृष्ण गाथा एक गाणें ॥

गायिकाः सुमन कल्याणपूर
गीतः यशोदकुमार गाळवणकर
संगीतः दशरथ पुजारी

कृष्ण गाथा एक गाणें जाणते ही वैखरी
एक तारी सूर जाणे श्री हरी जय श्री हरी ॥ धृ. ॥

तूं सखा तूं पाठिराखा तूंच माझा ईश्वर
राहिलासी व्यापुनीय तूंच माझे अंतर।
आळवीते नाम ज्याला अमृताची माधुरी ॥ १ ॥

पाहते मी सर्व ते ते कृष्ण रुपी भासते
रोज स्वप्नीं माधवाच्या संगती मी नाचते।
ध्यान रंगी रंगताना ऐकते मी बांसरी ॥ २ ॥

तारिलेसी तूं कन्हैया दिनवाणे, बापुडे
हीन मीरा त्यांहूनीहीं, भाव भोळे भाबडे
दे सहारा, दे निवारा या भवाच्या संगरी ॥ ३ ॥